लोकमत

# विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळेला तीन पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेला राष्ट्रीय सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षेचे तीन पुरस्कार रविवारी पुणे येथे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते देण्यात आले.

क्वीक हिल फाउंडेशन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने या प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी खान्देशच्या ग्रामीण, तसेच शहरी भागातील १०० शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन ७० हजार विद्यार्थी आणि २० हजार नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबद्दल प्रबोधन केले. त्याबद्दल तीन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सायबर सुरक्षा संदर्भात प्रबोधनासाठी विद्यापीठस्तरीय क्वीकहिल क्लबचे अध्यक्ष पायस सावळे, मीडिया डायरेक्टर प्रगती कोल्हे, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रशाळेचे संचालक प्रा. आर. जे. रामटेके, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

**हे आहेत पुरस्कार विजेते....**

विद्यार्थी मयूर बांडे, निखील हिरे यांना बेस्ट सायबर वॉरिअर टीम, तर रेवती फिरके या विद्यार्थिनीला बेस्ट कम्युनिटी डायरेक्टर उपविजेता घोषित करण्यात आले. प्रशाळा व विद्यापीठास बेस्ट क्लब ओव्हर ऑल रनर ऑफ हा पुरस्कार देण्यात आला.

Jalgaon Main
Page No. 4 Jan 14, 2025
Powered by: erelego.com